

शैलजा राजे • राजा मंगळवेढेकर • वसुधा पाटील • शरच्चंद्र बडोदेकर



म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा. क्र. ४२५

BVBK-0400425

बा·वा·
नों·क्र ४२५



वा. क्र. 824 दिनांक ......
विषय बा·वा· क्र. . .

BVBK-0400425

# अं ग त पं ग त

© १९६९ सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि.


*चित्रकार* : कृष्णा परब

*मुद्रक* : स. ना. तवकर
सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि. (मुद्रणालय),
वडाळा उद्योग भवन,
मुंबई–३१

*प्रकाशक* : ग. बा. नेवाळकर
सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि.,
१७२, नायगाव क्रॉस रस्ता,
मुंबई–१४

मूल्य : शंभर पैसे

# उंटाची मान



उंटाची मान
बारा हात
गोमेला पाय
एकशे सात
लांडग्याची शेळी
लांबची नात
गर्दभ गवई
बसतो गात
मधूनच झाडतो
एखादी लाथ
बकासुर खातो
डोंगराएवढा भात !



राजा मंगळवेढेकर

# नाच नाच मोरा




निळा निळा भोर
माझ्या अंगणात मोर
बांधिला मी त्याच्या पायी रेशमाचा दोर
काळे काळे शार
नभ आरपार
रडे मोर, अंगणात पावसाची धार
हिरवे हिरवे गार
गवत उंच फार
पात्यापात्यावर थेंब शुभ्र गार
पिवळी पिवळी फुले
पानोपानी हिरवे झुले
झुल्याझुल्यावर आले चतुर खुळे

नाचे नाचे रान
रुणुझुणु गान
नाचे वीज, जळ नाचे, इंद्राची कमान
नाच नाच मोरा
फुलव पिसारा
पायातला सोडिते मी रेशमाचा दोरा


*वसुधा पाटील*

# फजिती




कावळ्याला हवाय पाण्यातला मासा
पण चोचीत येईल कसा ?
बुड्या मारल्या दोन चार
पाणी लागलं गारगार
कुडकुड कावळा । मिटून डोळा
काव काव करीत । उडून गेला

*शैलजा राजे*



# चांदोबा



चांदोबा, चांदोबा, रंग तुझा छान
आजीच्या पण गोष्टींसाठी आहेत कुठे कान ?
चांदोबा, चांदोबा, आकार तुझा गोल
खाऊसाठी तोंड तुला आहे कुठे बोल ?
चांदोबा, चांदोबा, तुला नाहीत डोळे
फडताळातील लोण्याचे रे बघशील कसे गोळे ?
चांदोबा, चांदोबा, पाय कुठे गेले ?
पाठ नाही, पोट नाही, हात कुठे गेले ?
चांदोबा, चांदोबा, कारे बाबा असा ?
चांदण्यांच्या शेतामधील जणु भित्रा ससा
हसत नाही, बोलत नाही, खातोस तरी काय ?
देऊ का मी रोज तुला दुधावरची साय ?
चांदोबा, चांदोबा, ढगांचा तू राजा
माझ्याशी येतोस का वाजवायला बाजा ?
चांदोबा, चांदोबा, तुला नाहीत मित्र
माझा मित्र होशील तर देईन सारी चित्रं

*वसुधा पाटील*



# मनी

टण् टण् फुटाणा
गोल गोल वाटाणा
वाटाण्याची उसळ
मनी खाते मिसळ !
झण् झण् मिरची
लांब तिखटपूरची
लालभडक सोंड
मनीचे भाजले तोंड !
चिरा बाई चिरा
कुरु कुरु चिरा
कांदा घेतला रूसका
मनीला लागला ठसका !
रडू बाई रडू
डोळे झाले गडू
पाणी गेले पुसून
मनी बसली रूसून !



राजा मंगळवेढेकर


# माझी ताई



ताई माझी छान छान
गोरी गोरी पान पान
लाल परकर हिरवी चोळी
वेणीला रिबन पिवळी पिवळी
कानात डूल मोत्यांचे
पायात घुंगूर चांदीचे
लाल टिकली वर्खाची
गालावर खूण तिळाची

*वसुधा पाटील*

# ट्रिंग ट्रिंग



ट्रिंग ट्रिंग
वाजे फोन
हॅलो-हॅलो
कोण कोण
फोन आला बाळाला
ससा बोलावतो खेळायला !


*राजा मंगळवेढेकर*



# एक होता राजा


एक होता राजा - त्याचा पशाएवढा गाव
बोटाएवढी नदी - त्यात डोंगराएवढी नाव
मुठीएवढा राजा - त्याची हत्तीएवढी राणी
मुंगीएवढ्या महालात - गाई गोड गाणी
हत्तीएवढ्या राणीचा - झुरळाएवढा बाळ
हंडा हंडा दूध लागे - त्याला तिन्ही काळ
पशा एवढ्या राज्याचा - प्रधान भारी धीट
फुलांवरची पाखरं पाहून - त्याला येई झीट
मुठी एवढ्या राजाचा सेनापती शूर
लढाईला जाण्याआधी खाई मोतीचूर
पशा एवढ्या गावाची सव्वालाख प्रजा
एवढ्या साऱ्या प्रजेला पुरे एक खाजा
पशाएवढा गाव त्याला जगात भारी भाव
मैलभर मिशीवर राजा मारी ताव

*शैलजा राजे*



# भुड़ भुड़ भुडूऽऽश्या

भुड्भुड्भुडूऽऽश्या
अंघोळ छान करूऽऽश्या
अंघोळीचा थाट
रंगीत रंगीत पाट
त्यावर यशोदा राणी
गोपी घाली पाणी
पाण्याची चंगळ
सुरेखसं घंगाळ
छोटीशीच लोटी
कान्हा नाचवी मूठी
भुड्भुड्भुडूऽऽश्या
अंघोळ छान करूऽऽश्या




*राजा मंगळवेढेकर*

वाचनालय शाखा.
बाल
क्र 4.25

# सर्कस




मधूने काढली सर्कस
तंबू बांधला तिरकस
आईच्या स्वेटरच्या सात सळ्या
त्यावर ठेवल्या पाच फळ्या
शेजारचा चंदू बिनडोक
तोच झाला विदूषक
मधुचे होते मोत्या-मनी
ते झाले हुशार प्राणी
प्रेक्षकांच्यासाठी खास
वही फाडून केले पास
एकूण तयारी झाली जोरात
सर्कस सुरू झाली घरात




बघायला आले हत्ती - घोडे
प्रेक्षक जमले अगदी थोडे
मधू - चंदूने केला विचार
कोलांट्या मारल्या तीनचार
कोलांटी गेली वाकडी तिकडी
हत्ती मोडून गेला लाकडी
मनी मोत्याची झाली कुरबूर
लागले एकेक करायला गुरगूर
सर्कशीचा गोंगाट ऐकून
आई आली धावत बाहेरून
आईचे नुसते बघून डोळे
रिंगमास्तर धूम पळे
मोडली सर्कस, मोडला तंबू
प्रेक्षक पळाले करून चंबू

*शैलजा राजे*

# पोस्टमन




पोस्टमन, पोस्टमन
पत्र घ्या पत्र
आत या काका
तुम्ही आमचे मित्र
येतो, पण बांधा ना
दारातलं कुत्रं !



*राजा मंगळवेढेकर*

# बावळी





कावळी कावळी
अगदीच बावळी
कोकिळेची अंडी उबवली - उबवली
माया ममता केली - केली
कोकीळा आली दुरुन
पिलं गेली उडून
कावळी रडली पोटभर
कोकिळा गाते आंब्यावर

*शैलजा राजे*

# गटर्र गूँ



गटर्र गूँ गटर्र गूँ
बाळाच्या पायाला झाला बू
पायाला काय झालं बाई
मुंगी मावशी चावून जाई
हातात घे मोठी काठी
मुंगी मावशीच्या घाल पाठीत

*शैलजा राजे*


# वाकडे शेपूट

वाकडे शेपूट आणि तिखट नाक
चोरा चिलटांना माझा धाक
माणसाचा मी मित्र, राखतो इमान
शेपूट सरळ करील त्याला हाडुक इनाम
अंतराळात फेरी माणसाआधी लायकाची
मुलगी ती माझ्या रशियन काकाची

*शरचंद्र वडोदेकर*




# हमाल हमाल



हमाल हमाल
पाहिजे का हमाल
काय रे घेशील ?
केवढा माल ?
उचलीन फक्त
रेशमी रुमाल !

राजा मंगळवेढेकर


# भवरा



भिर भिर भवरा
गरगर फिरला
इकडून एक आला
तिकडून एक आला
दोघांची झाली टक्कर
बाळाला आली चक्कर

*शैलजा राजे*

# तुझं नि माझं



तुझं खेळणं    खणखण
माझं पळणं    दणदण
तुझं हसणं    खुदुखुदु
माझं नाचणं    दुडुदुडु
तुझं रूसणं    हुपहुप्
माझं फुगणं    भूप् भूप्

तुझं सगळं माझं
माझं सगळं तुझं
आपण हसू रूसू
डोक्यावरती बसू !



राजा मंगळवेढेकर

# झिम झिम झरति



झिम झिम झरति धारा ग
भिर भिर भरार वारा ग
भिजून गेले अंग अंग
जिकडे तिकडे रंग तरंग
गर गर गिरकी नाचू ग
सर सर गारा वेचू ग
जमीन हसते, येतो गंध
झाडे, वेली, पक्षी धुंद
आनंदगाणी गाऊ ग
रिमझिम माथी झेलू ग !

*राजा मंगळवेढेकर*

# आमचं बाळ



लाल लाल लाल
मऊ गोबरे गाल
काळे काळे काळे
गोल मोठे डोळे
इवले इवले ओठ
त्यांना मधाचे बोट
नकटे फेफटे नाक
त्याला नाही बाक
मऊ मऊ जावळ
डोळ्यांमध्ये काजळ
रुणझुण वाळे
हातापायाचे चाले

BVBK-0400425

क्र. 8.2.4
विषय

या गोड गोड गाण्यांप्रमाणेच तुम्हांला छान, छान गोष्टीही वाचायला आवडतील, नाही का? गमतीजमतीच्या गोष्टींची छोटी छोटी पुस्तकेसुद्धा आम्ही मुद्दाम बालवाचकांसाठी तयार केली आहेत. या गोष्टी अतिशय सोप्या भाषेत लिहील्या आहेत, मोठ्या अक्षरात छापल्या आहेत आणि शिवाय त्यांत सुंदर रंगीत चित्रेही आहेत. ही पहा त्या पुस्तकांची यादी :

## आवडत्या कथा

१ सशाची फजिती (*लीलाधर हेगडे*) **
२ कोल्होबाची चंगळ (*श्रीकृष्ण गंधे*) *
३ झाडाला जेव्हा पैसे लागतात (*तु. मो. साळी*) **
४ खाशी जिरली वाघोबाची (*भा. रा. भागवत*) **
५ जादूची पिशवी (*भा. रा. भागवत*) *
६ शेपटी अर्धी, त्यात दिवाळीची गर्दी ! (*शैलजा राजे*) *
७ कोल्होबा जिंकले कोल्होबा हरले ! (*शरच्चंद्र बडोदेकर*) *
८ पारिजातक (*वसंत शिरवाडकर*) *
९ मच्छरी शेटजी खीर खातात (*भा. रा. भागवत*) *
१० पराक्रमी इटकू पिटकू (*शैलजा राजे*) *
११ इटकू पिटकूंची सहल (*शैलजा राजे*) *
१२ मनी हरवली, मनी सापडली (*लीलाधर हेगडे*) **

* पन्नास पैसे        ** शंभर पैसे